# जाहीर नोटीस

तमाम पुरवठादार यांस कळविणेत येते की, जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग तसेच सर्व अधिनस्थ न्यायालयांच्या दैनंदिन कामकाजातील वापरासाठी व ग्रंथालयाच्या उपयोगासाठी खाली नमुद केलेल्या पुस्तकांचे नग १५ सेट (तिन पुस्तकांचा एक सेट) खरेदी करावयाची आहेत.

1) The Bhartiya Nyaya Sanhita, 2023

2) The Bharatiya Nagrik Suraksha Sanhita, 2023

3) The Bhartiya Saksh Adhiniyam, 2023

## अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग, मु.ओरोस यांचे नांवे असावे. सदर लखोटयावर **'कायदयांच्या पुस्तकांचे दरपत्रक'** असा उल्लेख करणेत यावा.

२) दरपत्रकामध्ये पुस्तकांची किंमत (Bare Act / Commentary), सेवाकर, लेखक इ. बाबी स्वतंत्र नमुद कराव्यात.

३) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमूद करावा. तसेच दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, पासबुकची पहील्या पानाची झेरॉक्स प्रत व रद्द केलेला चेक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) पुरविणेत आलेली कायदयाची पुस्तके ही चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहेत. पुस्तके खराब अथवा फाटलेली असल्यास ती पुस्तके बदलून देण्याची व्यवस्था संबंधीत विक्रेत्यांनीच करावयाची आहे.

५) सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

६) जाहीर निविदेमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

७) खरेदी करणेत आलेल्या सर्व पुस्तकांच्या अद्ययावत प्रती कार्यालयात पोचविण्याची जबाबदारी विक्रेत्यांवरच राहील. सर्व पुस्तके प्राप्त झाल्यानंतरच देयकाची रक्कम कोषागारामार्फत अदा करणेत येईल याची नोंद घेणेत यावी.

८) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचा राहील.

तरी, इच्छुक पुरवठादार यांनी वरील अटी व शर्तीस अधीन राहून **दि. ०४/०४/२०२५** पर्यंत आपली दरपत्रके जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथे सादर करावीत.

[signature] २५/03/2025

दिनांक :—२४/०३/२०२५

सहा. अधीक्षक (वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

म.जा.क्र.ग्रंथा./७६७९ सन २०२५
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस
दिनांक :— २४/०३/२०२५

प्रत माहितीसाठी व जरुरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)

२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)

३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)

४. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई—मेलद्वारे)

५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)

६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग—ओरोस (ई—मेलद्वारे)

७. मा.जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस यांचे नोटीसबोर्डवर

८. डी.एस्.ए., जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता